रयत शिक्षण संस्थेचे,

कला व वाणिज्य महाविद्यालय, पुसेगाव, ता.खटाव जि. सातारा

मराठी विभाग

आणि

महाराष्ट्र साहित्य परिषद, शाखा पुसेगाव

ता. खटाव जि. सातारा - ४१५५०२

या संस्थांमधील

# सामंजस्य करार

## MEMORANDUM OF UNDERSTANDING

Scanned by CamScanner

भारतीय गैर न्यायिक

एक सौ रुपये

Rs. 100

रु. 100

ONE HUNDRED RUPEES

सत्यमेव जयते

भारत INDIA

INDIA NON JUDICIAL

महाराष्ट्र MAHARASHTRA ◑ 2025 ◑ 46AB 165741

दुय्यम निबंधक अधिकारी वडूज (खटाव)

11 JUN 2025

PRINCIPAL
Arts & Commerce College,
Pusegaon, Tal. Khatav (Satara)

10 JUL 2025

(अ.अ.फडतरे) मुद्रांक विक्रेता
परवाना क्रमांक -
सहदिवाणी कार्यालय खटाव (वडूज)

रयत शिक्षण संस्थेचे,

कला व वाणिज्य महाविद्यालय, पुसेगाव

मराठी विभाग आणि

महाराष्ट्र साहित्य परिषद, शाखा पुसेगाव

या संस्थांमधील

सामंजस्य करार

Scanned by CamScanner

रयत शिक्षण संस्थेच्या कला व वाणिज्य महाविद्यालय पुसेगाव यांच्यातील सामंजस्य करार व मराठी विभागाच्या वतीने मराठी भाषा, साहित्य आणि संस्कृतीचे संवर्धन आणि विकसन करण्याच्या दृष्टीने आंतरराष्ट्रीय - राष्ट्रीय स्तरावर परिषद चर्चासत्राचे आयोजन, संशोधनात्मक शोधनिबंध व संशोधन प्रकल्प तयार करणे, दर्जेदार अध्यापनासाठी ज्ञानप्रसार आणि संशोधन या संदर्भात विविध उपक्रम राबविले जात आहेत. सृजनशीलतेच्या अनुषंगाने व विद्यार्थ्यांमध्ये अध्ययन क्षमता विकसित होण्याच्या दृष्टीने विविध विषयावर अभ्यागत व्याख्याने, कार्यशाळा, परिसंवाद इत्यादीचे आयोजन केले जाते.

कला व वाणिज्य महाविद्यालय, पुसेगाव मराठी विभाग आणि महाराष्ट्र साहित्य परिषद शाखा, पुसेगाव यांच्या बौद्धिक सहयोगातून आंतरराष्ट्रीय - राष्ट्रीय स्तरावर परिषद - चर्चासत्र, अभ्यंगत व्याख्याने, कार्यशाळा, कविसंमेलन, साहित्य संमेलन, निबंध, कथालेखन व वक्तृत्व स्पर्धा तसेच अन्य उपक्रमाचे आयोजन करण्याचा उद्देश असून कला व वाणिज्य महाविद्यालय, पुसेगाव मराठी विभाग आणि महाराष्ट्र साहित्य परिषद शाखा पुसेगाव, तालुका - खटाव, जि. सातारा या संस्था एकमेकांबरोबर सामंजस्य करार दिनांक १६ जुलै २०२५ रोजी करीत आहेत, या कराराची उद्दिष्टे खालील प्रमाणे निश्चित करण्यात आलेली आहेत.

उद्दिष्टे

१) मराठी भाषा, साहित्य आणि संस्कृती यांचे संवर्धन करण्याच्या उद्देशाने विविध उपक्रम राबविणे.

२) आंतरराष्ट्रीय राष्ट्रीय स्तरावर परिषद – चर्चासत्र, कार्यशाळेचे आयोजन करणे.

३) कविसंमेलन, साहित्य संमेलन व प्रश्नमंजुषा, निबंध – कथालेखन, वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करणे.

४) विद्यापीठीय अभ्यासक्रम व अन्य कोर्सच्या अनुषंगाने अभ्यंगताची व्याख्याने आयोजित करणे.

५) कथालेखन, काव्य लेखन, काव्यवाचन, कथाकथन या अनुषंगाने कार्यशाळेचे आयोजन करणे.

६) रोजगाराच्या संधी, उद्योग, व्यवसाय, स्पर्धा परीक्षा, नेट-सेट परीक्षा या संदर्भात तज्ज्ञ वक्त्यांची व्याख्याने व मार्गदर्शनपर कार्यशाळेचे आयोजन करणे.

७) विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्व विकास कौशल्याच्या दृष्टीने विविध प्रकल्प राबविणे.

८) सर्जनशील लेखन, उपयोजित मराठी लेखन प्रकल्प राबविणे.

९) मोडी लिपी, मुद्रित शोधन, पत्रकारिता इत्यादी अभ्यासक्रमाचे आयोजन करणे.

१०) मराठी भाषा, साहित्य आणि संस्कृती या संबंधाने येणाऱ्या समस्या व अडचणी शासकीय व स्वयंसेवी संस्थांना या संदर्भात सूचना पत्रव्यवहार करणे.

Scanned by CamScanner

एकमेकांना सहाय्य करण्याची प्रस्तावित माध्यमे

१) परस्पर हिताच्या शैक्षणिक बाबींमध्ये तसेच प्रशिक्षणामध्ये सहकार्य करणे.

२) विविध उपक्रमाचे आयोजन करण्यासाठी परस्परांशी सहकार्य करणे.

३) उपलब्ध साधनसामग्रीनुसार या संस्थाकडून एक निश्चित योजना तयार करणे.

४) शासन, साहित्य अकादमी, मराठी साहित्य व संस्कृती महामंडळ राज्य मराठी विकास संस्था यांचे उपक्रम राबविणे.

अटी

१) आपापल्या खर्चाने एकमेकांना सहकार्य करणे.

२) परस्पर सामंजस्य करारांची कोणत्याही क्षणी समाप्ती केली जाऊ शकते परंतु साठ दिवसांच्या पूर्व लेखी सूचनेनुसार दोन्हीपैकी कोणत्याही संस्थेला करार संपुष्टात आणता येईल.

३) कोणत्याही संस्थेस प्रवास व भोजन भत्ता देणे बंधनकारक नाही.

४) सदर परस्पर सामंजस्य कराराचा कालावधी दहा वर्षांचा राहील.

समन्वय

१) सदर कराराची व समन्वयक कामाची जबाबदारी महाविद्यालयाचे प्राचार्य, विभाग प्रमुख व महाराष्ट्र साहित्य परिषदेचे अध्यक्ष, सचिव यांच्यावर राहील.

२) सदर सामंजस्य करार कायदेशीर भाषेमध्ये तसेच कायदेशीर अटीशी अधीन राहून दोन प्रतीमध्ये अंमलात येत आहे.

३) खालील स्वाक्षऱ्यांचा सदर होऊन परस्पर सामंजस्य करार हा पुढील समन्वयक अधिकाऱ्यांत होत आहे, तसेच वर नमूद केलेल्या दिनांक व वर्षानुसार अमलात येत आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| श्री. संजय माधव<br>कार्याध्यक्ष<br>महाराष्ट्र साहित्य परिषद,<br>शाखा पुसेगाव | श्रीमती वैशाली फडतरे<br>अध्यक्ष<br>महाराष्ट्र साहित्य परिषद,<br>शाखा पुसेगाव | डॉ. हनुमत निमसे<br>मराठी विभाग प्रमुख<br>कला व वाणिज्य महाविद्यालय पुसेगाव | डॉ. राजेंद्र भोसले<br>प्र. प्राचार्य<br>कला व वाणिज्य महाविद्यालय, पुसेगाव |

महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे शाखा पुसेगाव ता. खटाव, जि. सातारा.

कला व वाणिज्य महाविद्यालय पुसेगाव

Scanned by CamScanner